महाराष्ट्र टाइम्स

०६ एप्रिल, २०११

# जरोतर्फे ऑनलाईन अभ्यासक्रम सुरु

कॅम्पस कनेक्ट




जारो एज्युकेशन संस्थेने 'रुट टू जॉब्स' आणि 'इंटरनॅशनल फायनान्शिअल रिपोर्टिंग स्टॅन्डर्ड्स' ऑनलाईन व क्लासरुम अभ्यासक्रम सुरु केल्याची औपचारिक घोषणा संस्थेचे संचालक संजय साळुंखे यांनी पत्रकार परिषदेत केली. या प्रसंगी युबीआयचे अधिष्ठता डर्क डेनेन, संचालक ल्युसियन वॅन डिव्हो आणि बॉलीवुड अभिनेत्री अदिती गोवित्रीकर यांच्या सह संस्थेचे फैकल्टी आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

सर्वोत्तम दर्जाचे शिक्षण उपलब्ध करुन देण्यासाठी जारोने बेल्जियम येथील युनायटेड बिझनेस इन्स्टिट्यूट या संस्थेबरोबर भागीदारी केली आहे. 'रुट टू जॉब्स' हा बँक अधिकारी, एलआयसी, जीआयसी, एसएससी, यूपीएससी, एमपीएससी, आरआरबी,एनडीए,सीडीएस इत्यादी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आखण्यात आलेला अभ्यासक्रम आहे तर 'आयएफआरएस' हा अभ्यासक्रम आंतरराष्ट्रीय अकाऊंटिंग मानकांची मूलभूत तत्वे शिकवणारा आहे. 'आयएफआरएस' हा अभ्यासक्रम मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य वित्तीय अधिकारी आणि लेखा क्षेत्रातील सर्व व्यावसायिक गरजा नजरेसमोर ठेवत तयार करण्यात आला आहे. त्यामुळे या व्यावयिकांचे आंतराष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील स्पर्धात्मक सामर्थ्य वाढवण्यास मदत होणार आहे.

या संदर्भातील अधिक माहितीसाठी www.route2jobs.org या वेबसाईटला भेट द्यावी.